# ई - पोलीस पत्रिका

दि १७/०१/२०२२ अनु.क्र. ११

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

## नेमणुक

### १.क्र. पोआअ/आस्था-१/चापोशि भरती-२०१९ नियुक्ती/४६४/२०२२ अमरावती शहर दि. १४.०१.२०२२

### नियुक्ती आदेश

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात, पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर चालक पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्ययाकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक सेवाप्रवेश नियम २०१९ मधील तरतुदीनुसार चालक पोलीस शिपाई (गट-क, अराजपत्रीत) पदाची भरती प्रक्रीया राबविण्यांत आली आहे. चालक पोलीस शिपाई सेवाप्रसेवा प्रवेश नियम २०१९ नुसार खालील नमुद उमेदवार वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी, शारीरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी चारीत्र पडताळणी व वैदयकीय तपासणीमध्ये पात्र ठरल्याने त्यांची नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ २१७००-६९१००/- अधिक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्यासह) मध्ये चालक पोलीस शिपाई पदी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार निवड तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | उमेदरावाचे नाव | जात/प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नेमणुकीचे ठिकाण | आस्थापनेवरील दिलेला ब.नं. | प्रथम नियुक्तीचे निश्चित केलेले देय वेतन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वेतन स्तर एस-७ | वेतन |
| ०१ | जितेश त्र्यंबकराव चौधरी | तेली/इमाव | खुला (माजी सैनिक) | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २००९ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०२ | वैभव शंकरराव कोंडे | कुणबी/इमाव | खुला | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१० | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०३ | सागर मुकुंदराव वानखडे | महार/अनु. जाती | खुला | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०११ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०४ | रोशन जयदेव माहुरे | महार/अनु. जाती | खुला | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१२ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०५ | शुभम बबनराव हागोने | कुणबी/इमाव | इमाव | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१३ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | सुयोग सुधाकर काळबांडे | महार/ अनु.जाती | अनु.जाती | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१४ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०७ | भुषण सुभाषराव नितनवरे | महार/ अनु.जाती | अनु.जाती | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१५ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०८ | धर्मेंद्र अशोकराव सुने | बारी/इमाव | इमाव | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१६ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ०९ | अब्दुल समीर अ.सलीम | पिंजारी/ इमाव | इमाव | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१७ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १० | किशोर यशवंतराव खेंगरे | मराठा/ खुला | आर्थीक दुर्बल घटक | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१८ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| ११ | अनिल वसंतराव तायवाडे | माळी/ इमाव | इमाव (माजी सैनिक) | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१९ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १२ | राहुल वसंतराव दुधे | बारी/ इमाव | इमाव | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०२० | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १३ | सागर प्रकाश राठोड | मराठा/ खुला | आर्थीक दुर्बल घटक | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०२१ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १४ | बळीराम सुदाम गायकवाड | मराठा/ खुला | आर्थीक दुर्बल घटक | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०२२ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १५ | आकाश जयभिम कांबळे | महार/अनुज ाती | अनु. जाती | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०२३ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |
| १६ | मंगेश प्रकाश मानकर | कोळी/ विमाप्र | विमाप्र | पोलीस मुख्यालय, अम.शहर | २०१४ | रु. २१७००-६९१००/- | रु२१७००+वि.वे. रु. ७५०/- |

## रजा

**१.क्र.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/४७२/२०२२ अमरावती दि. १७.०१.२०२२**

**आदेश**

खालील नमुद महीला पोलीस अमंलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधीकरीता त्यांच्या बाळाच्या संगोपनाकरीता विशेष बालसगोपन रजा मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | नांव, पदनाम, ब.नं. | नेमणुक | मंजुर बालसंगापन रजा |
|---|---|---|---|
| ०१ | मपोशि. रजनी ढवळे/५४५ | पोमुख्यया | ६० दिवस बालसंगोपन रजा रजेवर सुटलेल्या दिनांकापासुन मंजुर (प्रसुती रजेला जोडुन) |
| ०२ | मपोना. भाग्यशाली पवार/८१३ | पोमुख्या | ६० दिवस बालसंगोपन रजा रजेवर सुटलेल्या दिनांकापासुन मंजुर |
| ०३ | मपोशि. प्रणाली ढोले/३१९ | पोमुख्या | ६० दिवस बालसंगोपन रजा रजेवर सुटलेल्या दिनांकापासुन मंजुर |

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त /मयत / नाव कमी करणे

## शिक्षा

**१.क्र.पोआअ/विचा-१/गै.कसुरी/अ.आ./पोना१८४ नेहारे/२२९/२०२२ अम. दि. ०७.०१.२०२२**

**आदेश**

**कसुरदाराचे नाव :-** पोना. १८४, सुर्यकांत नेहारे, नेमणुक पो.स्टे. वलगांव, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

पोना. सुर्यकांत देवरावजी नेहारे/१८४, नेमणुक पो.स्टे. वलगांव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमच्या दि. ०४.०५.२०२१ ते दि. ०१.१०.२०२१ पावेतो एकुण १५० दिवस कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहील्याच्या कसुराबाबत करण्यांत आलेल्या प्राथमिक चौकशी मध्ये तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केल्याचे दिसुन येत आहे.

प्राथमिक चौकशीतील दोषारोप :- अनाधिकृतपणे गैरहजेरीच्या कसुराबाबत प्राथमिक चौकशी करण्ययांत आली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.स्टे. वलगांव अम.शहर यांना सादर केलेल्या प्राथमीक चौकशी मध्ये तुम्ही दि. ०४.०५.२०२१ ते दि. ०१.१०.२०२१ पावेतो एकुण १५० दिवस पो.स्टे. ला कोणतीही माहीती न देता तसेच तुमचे आजाराबाबत किंवा तुमच्या पत्नीच्या प्रकृती बाबत कोणतीही माहिती न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहीले. तसेच तुम्ही वारंवार विनाकारण कर्तव्यावर गैरहजर राहण्याचे सवयीचे असुन तुम्ही वरिष्ठांना दिशाभुल करुन गैरहजर राहण्याची कसुरी केल्याचे प्राप्त दस्तऐवजावरुन व केलेल्या चौकशी वरुन निष्पन झाले आहे.तुमच्या

अशा प्रकारे कर्तव्यात बेशिस्त, बेजबाबदारपणाचे वर्तनामुळे इतर कर्मचाऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुमच्या यया कसुराबाबत खालील प्रमाणे अंतिम शिक्षेचे आदेश पारीत केरण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोना. १८४, सुर्यकांत देवरावजी नेहारे, नेमणुक पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर नेमणुक पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर यांना **प्राधिकारानुसार रु. १०००/- आर्थिक दंड हि शिक्षा कायाम करण्यांत येत आहे.**

**२.जा.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोना-१३५५लांजेवार/१२५६०/२०२२अम. दि.२९.१२.२०२१**

**आदेश**

**कसुरदाराचे नाव :-** पोना१३५५, राजु लांजेवार, नेमणुक पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

पोना. १३५५, राजु लांजेवार, पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दि. २४.०८.२०२१ चे १०.३० वा दरम्यान अमरावती शहरातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी राजापेठ पोलीस स्टेशन हदीत गद्रे चौक परिसरात असलेल्या भारतीय जनता पार्टी पक्षाचे संपर्क कार्यालयावर हल्ला करु न कार्यालया बाहेर असलेल्या फलकावर ऑईल व शाई फेकुन फलकाचे नुकसान केले आहे. सदर घटनेबाबत श्री. जगदीश ऊर्फ किरण विष्णुपंत पातुरकर यांच्या फिर्याद वरु न पो.स्टे. राजापेठ अप क्र. १११४/२१ कलम १४३,१४७,१४८,१४९,४४८,४३५,४३६,४२७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्हयांची फिर्याद देवून भारती जनता पार्टी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी पो.स्टे. राजापेठ बाहेर आल्यानंतर बंदु हॉटेल समोर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या पुतळयांचे दहन केले आहे. त्याबाबत देखील पोना.१३५५ राजु लांजेवार पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर यांचे फिर्याद वरुन पो.स्टे. राजापेठ अप क्र. १११५/२०२१ कलम १४३,१८८ भादंवि सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. दि. २४.०८.२०२१ रोजी झालेल्या प्रकार टाळता येवू शकला सबब चालु घडामोडीवर लक्ष ठेवून व परिस्थीतीचा अंदाज घेवून राजकीय कार्यकत्याच्या हालचाली व त्यांच्या हातुन घडु शकणाऱ्या संभाव्य घटना बाबतची गोपनिय माहिती मिळविण्यांत अपयशी ठरल्याने आपण कर्तव्यात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करुन कसुर केलेला आहे. खालील आदेश पारीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

वर नमुद कसुराबाबत कसुरीबाबत **सक्त ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**३.जा.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी गैरहजर/पोहवा१०३३ सिझवी+१/२३६/२०२१ अम. दि. ०७.०१.२०२२**

## सुधारीत आदेश

पोहवा.१०३३ मिर फे. सिझवी पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर , पोशि. १३०७ प्रविण थोरवे, पो.स्टे. नागपुरी गेट अमरावती शहर असुन येथे दिनांक १४.१०.२०२१ रोजी १८.१० वाजता सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग यांनी नेहमीप्रमाणे सिटी कोतवाली पो.स्टे. भेट देवून पोलीस कोठडीची तपासणी केली असता पोलीस कोठडीमध्ये एकही आरोपी नव्हता सदर वेळी पोलीस कोठडी पहाऱ्यावर पोना १४३७, विनोद टेंभुर्णे हे सतर्क मिळुन आले. तसेच पोलीस कोठडीच्या संरक्षणार्थ गार्ड करीता गार्ड प्रमुख पोहवा.१०३३ मिर फे. रिझवी यांच्या सह पोना.१३०७ प्रविण थोरवे, पोना.१२७७ संतोष टेंभरे व पोना.२३२ दिलीप अतकर यांची नेमणुक करण्यांत आली होती. परंतु सदरवेळी गार्ड प्रमुख पोहवा. १०३३ मिर फे. रिझवी व पोना. १३०७ प्रविण थोरवे हे दोघेजण कर्तव्यावर गैरहजर असल्याचे आढळुन आले. त्याबाबत हजर असलेल्या गार्ड मधील पोना.१४३७ विनोद टेंभुर्ण, पोना. १२७७ संतोष टेंभुर्ण व पोना. २३२ दिलीप अतकर यांना विचारणा केली असता ते दोघेही त्यांना न सांगता गेलेले असल्ययाचे त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलीमा आरज यांचे समक्ष सांगीतले. त्याबाबत सिटी कोतवाली पोलीस ठाणे येथे ठाणे दैनंदीनी क्र. ३३, दि. १४.१०.२०२१ अन्वये सविस्तर नोंद घेण्यांत आली असुन कर्तव्यावर गैरहजर असल्याने नमुद कसुरदार यांना देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत आली होती.

परंतु सदरची शिक्षा माफ होणेबाबत पुनर्विलोकन विचार विनंती अर्ज सादर केल्याने प्रस्तुत प्रकरणात दिलेली शिक्षा व तुम्ही अर्जा मध्ये सादर केलेले नविन मुद याबाबत आम्ही बारकाईन सत्यता पडताळणी करुन व तुमच्या भविष्ययाचा साकल्याने विचार करुन विशेष बाब म्हणुन सुधारीत आदेश **सक्त ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**वेतन / वेतन संरचना / वेतन निश्चिती/वार्षिक वेतनवाढ/ संकीर्ण**
**निरंक**

**( लक्ष्मण डुंबरे )**
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर

प्रत, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/ सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती करीता .